Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक
### तातडीचे आणि महत्वाचे

शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभाग, प्रशाळा, केंद्र, अध्यासन यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या संपूर्ण वर्षाच्या प्रथम व द्वितीय सत्रासाठी (Odd & Even Semester) सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) नियुक्तीकरिता विहित कार्यपध्दतीनुसार Google form द्वारे यापूर्वी संदर्भ क्र. आस्थापना/पीजी/३६४, दि. २५/०३/२०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार तसेच दैनिकांमध्ये जाहिरात प्रसिध्द करून माहिती मागविण्यात आली होती. याद्वारे प्राप्त झालेली माहिती संबंधित अधिविभागप्रमुखांना एसयु/आस्थापना पीजी/४१९, दि. १७/०४/२०२६ रोजी ईमेलवर पाठविण्यात आली आहे.

परंतु ज्यांना सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून अध्यापनाचे कामकाज करावयाचे आहे, तथापि त्यांनी दि. २५/०३/२०२६ च्या परिपत्रकानुसार / जाहिरातीनुसार विहित कार्यपध्दतीनुसार Google form भरलेला नसेल तर त्यांच्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) नियुक्तीसाठी पुन:श्च विहित कार्यपध्दतीनुसार Google form द्वारे माहिती मागविण्यात येत आहे. तरी आपल्या अधिविभागामध्ये सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून अध्यापनाच्या कामकाजासाठी जे उमेदवार इच्छुक आहेत, अशांना विद्यापीठ संकेतस्थळावरील Recruitments Tab वर दिलेल्या Google form च्या लिंकद्वारे माहिती भरण्याबाबत अवगत करावे. तसेच विद्यापीठामधील / महाविद्यालयामधील नियमित, हंगामी शिक्षकांना विद्यापीठाच्या अधिविभागामधील / केंद्र / अध्यासनामधील अन्य अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून अध्यापनाचे कामकाज करावयाचे असल्यास, त्यांनी देखील Google form च्या लिंकद्वारे माहिती भरावी. माहिती भरण्याची अंतिम मुदत ही दि. २८/०८/२०२६ पर्यंत आहे. विहित मुदतीनंतर कोणत्याही प्रकारे माहिती स्वीकारली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

तसेच यापूर्वी ज्यांनी दि. २५/०३/२०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार विहित कार्यपध्दतीनुसार Google form भरला असेल, त्यांनी पुन:श्च माहिती भरण्याची आवश्यकता नाही. परंतु ज्यांनी त्यावेळेस Google form भरला नसेल आणि त्यांना सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून अध्यापनाचे कामकाज करावयाचे आहे, त्यांनी सदर परिपत्रकाद्वारे विहित कार्यपध्दतीनुसार दि. २८/०८/२०२६ पर्यंत Google form द्वारे माहिती भरणे अनिवार्य आहे. ज्या उमेदवारांची Google form द्वारे माहिती प्राप्त होणार नाही, त्यांना सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून मान्यता देता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

सदरची बाब आपल्या अधिविभागामधील / केंद्र / अध्यासनामधील सर्व नियमित, हंगामी तसेच सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) यांच्या निदर्शनास आणावे आणि शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी सहयोगी शिक्षक (Contributory Teacher) म्हणून अध्यापनाच्या कामकाजासाठी जे उमेदवार इच्छुक आहेत, अशांना विद्यापीठ संकेतस्थळावरील Recruitments Tab वर दिलेल्या Google form च्या लिंकद्वारे माहिती भरण्याबाबत अवगत करावे.

आदेशावरून,

कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/पीजी/1453
दिनांक : 24 AUG 2026

प्रति:

१. अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, सर्व अधिविभाग, प्रशाळा, केंद्र, अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
-\ सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.
२. लेखा विभाग - ॲकॅडमिक डिपार्टमेंट / स्कूल्स बिल्स युनिट यांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरू व मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे कार्यालयास माहितीसाठी.

D:\Contributory Teacher\advertise 2024-25, 2025-26 and process for Contributory Teacher